


**माहूर :** दत्तजयंती उत्सव ६ ते १० डिसेंबर दरम्यान साजरा होणार आहे. त्या अनुषंगाने अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. धरण, मुख्याधिकारी डॉ. राजकुमार राठोड, पोलिस निरीक्षक नामदेव रिठे, सपोनी अण्णासाहेब पवार, महावितरणचे रापतीवार संतोष नागलवाड आदी अधिकारी व कर्मचारी यांनी यात्रा निर्विघ्न पार पाडण्यासाठी पाहणी केली.

दै. लोकमत दि. 06/12/2022

# सराईत गुन्हेगारांना अटक, दुचाकी, लॅपटॉप, मोबाइल जप्त

दै. लोकमत दि. 06/12/2022

## वजिराबाद गुन्हे शोध पथकाची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** पेट्रोलिंग करताना संशयास्पद आढळलेल्या दोघांची वजिराबाद गुन्हे शोध पथकाच्या कर्मचाऱ्यांनी चौकशी केली. सदर दोघे सराईत गुन्हेगार असल्याचे समजल्यानंतर त्यांना वज़िराबाद ठाण्यात नेऊन चौकशी केली. त्यांच्याकडून अनेक गुन्हे उघड झाले. दरम्यान, त्यांच्याकडून चोरीच्या तीन दुचाकी, लॅपटॉप आणि आठ मोबाइल जप्त करण्यात आले.

उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख आणि वजिराबाद ठाण्याचे पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखाली ५ डिसेंबर रोजी वजिराबाद ठाण्याचे गुन्हे शोध पथक गस्तीवर होते. रेल्वेस्थानकासमोरील रस्त्यावर गुन्हेगारांच्या यादीत असलेला शेख सलमान शेख निसार रा.तेहरानगर व शेख अशफाक शेख रज्जाक रा.नुरी चौक हे अस्पष्ट नंबर असलेल्या पल्सरवर आढळून आले. त्यांना थांबवून दुचाकीची कागदपत्रे विचारली असता उडवाउडवीची उत्तरे दिले. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या पद्धतीने विचारणा केली असता सदर दुचाकी पार्डी ता. लोहा येथून चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्यांना ठाण्यात नेऊन अधिक चौकशी केली असता इतर गुन्ह्यांचीही कबुली दिली.

### राज कॉर्नर परिसरात पहाटे केली होती वाटमारी

आरोपी शेख सलमान शेख निसार याने त्याचे साथीदार आरोपी शेख शाहेद शेख ईब्राहिम व तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या मदतीने १५ ते २० दिवसांपूर्वी पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास एका व्यक्तीला राज कॉर्नर येथे अडवून त्यांच्याकडील लॅपटॉप आणि मोबाइल काढून घेतल्याची कबुली दिली. दरम्यान, सदरील सर्व आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जवळपास ३ लाख २० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. यामध्ये तीन दुचाकी, लॅपटॉप आणि आठ मोबाइलचा समावेश आहे. ही कारवाई गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, पोलीस अंमलदार दत्तराम जाधव, पोना शरदचंद्र चावरे, गजानन किडे आदींनी केली.